# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १२.१०.२०२६

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.११/१०/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १३०४५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.११/१०/२०२६ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ९८३००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरुद्ध विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणा—या विरुध्द दि.११/१०/२०२६ रोजी पोस्टे हिंगोली शहर ०१व वसमत ग्रामिण ०१ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये ०२ गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस करत आहे